नि.दि.दावा क्र.४२४/२०१८

निशाणी क्र.१८

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. पी.एस. निमसे यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे आहे की माझा घटस्फोट झाला आहे. दावा मिळकतीचे गट नंबर माझ्या लक्षात नाही. सर्व दावा मिळकती मला खरेदीखताने आलेल्या नाहीत. सर्व दावा मिळकती वडीलोपार्जीत आहेत. हे मला माहीत नाही की दावा मिळकतींचे वाटप दि.१२.१.२०१५ रोजी झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आईवडीलांनी प्रतिवादीला लग्नात ५१०००/– रुपये दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने मला कधीही त्रास दिलेला नाही व मला दारु पिवुन कधीही त्याने मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ याने 'लग्नात हुंडा दिला नाही म्हणुन मला माहेरुन पैसे घेवुन ये' असे कधी म्हणाला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या सासु सासरे व पती यांना न सांगता कधीही बाहेर निघुन जात असे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने कोर्टाकडुन मी नांदायला येण्याबाबतचा हुकुम मिळुनही मी कधी नांदायला गेले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी नांदायला गेले नसल्याने प्रतिवादीने दि.२०.६.२०१९ रोजी घटस्फोटाचा निकाल मिळवला. हे म्हणणे खरे नाही की माझा घटस्फोट झाल्याने मला प्रतिवादीकडुन काही मागणी करण्याचा अधिकार नाही. मी सांगते की घटस्फोटाआधी हे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीच्या नावावर वाटपात ४० आर व १२ आर खराबा क्षेत्र असे एकुण ५२ आर क्षेत्र आले आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं.६३ मध्ये विहीर असुन त्या विहीरीतुन पाणी घेण्याचा हक्क समान हिस्याने ठेवण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं.६५ व गट नं.१०६ हे माझे सासु, सासरे यांना उदरनिर्वाहाकरीता ठेवले आहेत.

प्रश्न– गट नं.१३५ हा वडीजोपार्जीत नसुन खरेदी मालकीचा गट आहे?

उत्तर– आजोबांनी माझ्या पतीस ती जमिन खरेदी दिली आहे.

हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी नं.२ च्या बहीणी नामे जनाबाई उर्फ जिलाबाई दारकु वाव्हळ व दगडाबाई पांडुरंग शिंदे यांना मी दाव्यात सामील केले नाही. मी त्यांना का सामील केले नाही याचे कारण सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की माझा घटस्फोट झाला असल्याने माझ्या पतीला, दिराला, सासु, सास–यांना त्रास देण्याच्या हेतुने मी हा

खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतींचे अगोदरच वाटप झाले असल्याने मला हक्क हिस्सा मागण्याचा कुठलाही अधिकार नाही.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2026.03.18 14:56:16 +0530

( डॉ. एन.एस.सबनीस )

दिनांक : १७/०३/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

पारनेर